## ००० प्र क र ण - ति स रे ०००

### सांगली जिल्हा परिचय


३·१ सांगली जिल्हा इतिहास.

३·२ सांगली जिल्हा स्थान·

३·३ जिल्हा क्षेत्र व प्रशासकीय विभाग·

३·४ स्वाभाविक रचना व जमिनीचा प्रकार·

३·५ हवामान व पर्जन्यमान·

३·६ ओलिता खालील क्षेत्र·

३·७ सांगली जिल्हा लोकसंख्या·

३·८ जिल्हातील सहकार, उद्योग, शैक्षणिक, सुविधा, बँक कार्यालय, नागरीविभाग·

३·९ सांगली जिल्हा खास वैशिष्टये·

३·१० ग्रामीण विकासाकरिता राबविलेला कार्यक्रम·

३·११ नागरी विकासाकरिता राबविलेला कार्यक्रम·


xxxxxx

## ००० प्र क र ण - ति स रे ०००

## सांगली जिल्हा परिचय

### ३.१ : सांगली जिल्हा इतिहास :

सातारा जिल्ह्याचे १९४९ मध्ये दोन भाग करून उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले. मुळच्या सातारा जिल्ह्यातील तासगांव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालुके तत्कालीन मिरज व जत संस्थाचे दोन तालुके असा एकूण ६ तालुक्याचा दक्षिण सातारा जिल्हा स्थापन करण्यात आला, त्यानंतर २१ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र शासनाने या दक्षिण सातारा जिल्ह्याचे सांगली जिल्हा असे नामकरण केले. १९६५ मध्ये मिरज तालुका फोडून कवठेमहांकाळ आणि खानापूर तालुका फोडून आटपाडी असे आणखी दोन नवीन तालुके निर्माण केले. अशा प्रकारे १९६५ पासून सांगली जिल्हा आठ तालुक्याचा झाला. सांगली जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्रातील पुणे महसूल विभागात आहे.

### ३.२ : जिल्ह्याचे स्थान :-

हा जिल्हा १६°-ते ४५° ते १७°-३३° उत्तर अक्षांश व ७३°-४२° ते ७५° - ४०° पूर्व रेखांश मध्ये विस्तारलेला असून जिल्ह्याचा आकार पूर्व पश्चिम लांबट चिपोळा आहे. जिल्ह्याचा विस्तार सह्याद्रीच्या पूर्व उत्तरापासून पूर्व-पश्चिम अंदाजे २०५ कि.मी.लांब आणि मध्यभागी दक्षिणोत्तर अंदाजे ९६ कि.मी.रुंद आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस सोलापूर, व सातारा दक्षिणेस कोल्हापूर व कर्नाटकातील बेळगांव, पश्चिमेस रत्नागिरी व पूर्वेस कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा अशा चतुःसिमा आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय मिरज तालुक्यातील सांगली येथे आहे.

२·३ : जिल्ह्याचे क्षेत्र व प्रशासकीय विभाग :

सांगली जिल्ह्याचे क्षेत्रफळ ८६०२ चौ·कि·मी· असून भौगोलिक क्षेत्रफळामध्ये या जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यात एकोणिसावा क्रमांक लागतो· सांगली जिल्ह्यामध्ये ८३०३ चौ·कि·मी·ग्रामीण क्षेत्र असून २९९ चौ·कि·मी·क्षेत्र नागरी आहे· या जिल्ह्यामध्ये १९९१ लोकसंख्यानुसार ७२७ खेडी व ९ शहरी विभाग आहेत· यामध्ये २ खेडी निर्जन आहेत· जिल्ह्यात मार्च १९९१ अखेर एकूण ६७६ ग्रामपंचायती असून सांगली,मिरज इस्लामपूर,तासगांव विटा व आष्टा या शहरामध्ये नगरपालिका आहेत·

प्रशासनाचे सोयीसाठी सांगली जिल्ह्याचे वाळवा व मिरज असे दोन महसूल विभाग पाडण्यात आले होते· वाळवा विभागात वाळवा, शिराळा,खानापूर व आटपाडी या तहसिलांचा तर मिरज विभागात मिरज,तासगांव,कवठेमहांकाळ व जत तहसिलांचा समावेश होता· परंतु दिनांक २६ जानेवारी १९९२ रोजी वाळवा विभागातील खानापूर व आटपाडी तहसील काढून घेऊन या दोन तहसिलांचा आणखी एक स्वतंत्र विभाग करण्यात आला· वाळवा, मिरज व खानापूर या विभागाची मुख्यालये अनुक्रमे इस्लामपूर, मिरज व विटा येथे ठेवण्यात आली· अशा प्रकारे सांगली जिल्ह्यामध्ये आता तीन प्रशासकीय विभाग निर्माण झाले आहेत·

२·४ : स्वाभिक रचना व जमिनीचा प्रकार :

जिल्ह्यातील नद्या, डोंगर, भूपृष्ठ रचना, हवामान व पर्जन्यमान यानुसार जिल्ह्याचे पुढील तीन स्वाभाविक विभाग पडतात·

अ) पश्चिमेकडील डोंगराळ जास्त पावसाचा भाग शिराळा तालुका·

ब) नद्यांच्या सान्निध्यातील मध्यम पावसाचा सपाट भाग यामध्ये संपूर्ण वाळवा तालुका आणि तासगांव व मिरज तालुक्यातील पश्चिम भागाचा समावेश होतो·

क) पूर्वेकडील माळ रानांचा व कमी पाऊसाचा कायम दुष्काळी भाग यामध्ये संपूर्ण कवठेमहांकाळ जत, आटपाडी, खानापूर आणि मिरज व तासगांव तालुक्याचा पूर्व भाग व आवर्षण प्रवण क्षेत्रातील तालुक्यांचा समावेश होतो.

जिल्ह्यामध्ये विविध प्रकारची माती आढळते. उदा. तांबडी व तपकिरी रंगाची, काळी व फिकट करड्या रंगाची मुरूम मिश्रीत माती आढळते. जिल्ह्यामध्ये कृष्णा, वारणा, येरळा, माण व अग्रणी या प्रमुख नद्या आहेत.

३.५ : हवामान व पर्जन्यमान :

जिल्ह्याचे हवामान मुख्यत्वे करून कोरडे असून जुलै ते सप्टेंबर पाऊसाळा, ऑक्टोबर ते फेब्रुवारी हिवाळा, तर मार्च ते जून दरम्यान उन्हाळा असतो. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ५१० कि.मी. असून शिराळा व वाळवा तालुक्यात तो सरासरी पेक्षा अधिक आहे. इतर तालुक्यात ते सरासरी पेक्षा कमी आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस शिराळा तालुक्यात पडतो, त्या खालोखाल वाळवा व मिरज तालुक्यात पडतो.

जत आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर व तासगांव हे आवर्षण तालुके असून या तालुक्यामध्ये सरासरी ४१७ ते ४९१ मि.मी. दरम्यान पाऊस पडतो.

३.६ : ओलिताखालील क्षेत्र :

सांगली जिल्ह्यातील एकूण ८५६२९६ हेक्टर क्षेत्रापैकी १२३५८० हेक्टर क्षेत्र म्हणजेच १९ टक्के क्षेत्र ओलिता खाली आहे. या पैकी खाद्य पिकाखाली ११२२३० हेक्टर असून ते ९२ टक्के आहे, बाकीचे

अखाद्य पिकाखालील क्षेत्र आहे. प्रामुख्याने भात, गहू, ज्वारी, हरभरा, मिरची, ऊस, हळद, द्राक्षे, केळी, भाजी, टोमॅटो, व इतर भाजीपाला कापूस भुईमूग, करडई, सूर्यफूल, ही पिके प्रामुख्याने ओलिता खाली घेतली जातात.

२.७ : लोकसंख्या :

सांगली जिल्ह्याची १९९१ च्या जनगणाने प्रमाणे लोकसंख्या २१,९७,९७७ होती त्यापैकी १०,८०,१०० स्त्रिया होत्या.

अ) घनता :- जिल्ह्यात १९९१ च्या जनगणानेनुसार लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. मागे २५६ असून हे प्रमाण मिरज तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ६८२ तर जत तालुक्यात सर्वात कमी म्हणजे १०६ एवढे आहे.

ब) ग्रामीण व नागरी लोकसंख्या :- सांगली जिल्ह्यामध्ये भागात १६,९५,९६५ म्हणजे ७७ टक्के तर नागरी ५,०२,०१२ म्हणजे २३ टक्के लोक १९९१ मध्ये राहत होते.

क) स्त्री पुरुष प्रमाण :- सांगली जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ११,१७,८७७ पुरुष होते तर १०,८०,१०० स्त्रिया होत्या. दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९६६ असून शहरी व ग्रामीण भागात हेच प्रमाण अनुक्रमे ९३२ व ९७७ होते. तालुकानिहाय प्रमाण पाहिले असता दर हजार पुरुषामागे स्त्रिया सर्वात जास्त म्हणजे १०५८ शिराळा तालुक्यात त्या खालोखाल १०७० खानापूर तालुक्यात व सर्वात कमी म्हणजे ९३४ मिरज तालुक्यात आढळून येतात.

ड) धर्मानुसार, वयोगटानुसार व अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या :- सांगली जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी ८६११७ टक्के हिंदू

७·३४ टक्के मुस्लीम, ३·४७ टक्के जैन, २·३५ टक्के बौद्ध, ०·४८ ख्रिश्चन व ०·०१ टक्के शीख आहेत· एकूण लोकसंख्यापैकी ३८ टक्के लोकसंख्या ० ते १४ वयोगटातील ९ टक्के लोकसंख्या १४ ते १९ वयोगटातील ८ टक्के लोकसंख्या २० ते २४ वयोगटातील २९ टक्के लोकसंख्या २५ ते ४९ वयोगटातील ७६ टक्के लोकसंख्या ५० ते ५५ वयोगटातील ७ टक्के लोकसंख्या ६० वर्षावरील वयोगटातील आहे· २ टक्के लोकसंख्या अनिर्देशित वयोगटातील आहे·

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्यापैकी ११ टक्के लोक अनुसूचित जातीचे आहेत तर ०·८५ टक्के लोक अनुसूचित जमातीचे आहेत·

## ३·८ : जिल्ह्यातील सहकार :

सांगली जिल्ह्यात सहकारी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे· जिल्ह्यात जून १९९१ अखेर ३०१३ सहकारी संस्था होत्या· जिल्ह्यात प्राथमिक कृषि सहकारी संस्था ५३२ होत्या· प्राथमिक कृषि सहकारी संस्थांची सभासद संख्या ३·२७ लाख होती, दुग्ध व्यवसाय संस्था संघ, महासंघ होती· जिल्ह्यात साखरकारखान्यांची संख्या ८ इतकी आहे·

१) जिल्ह्यातील उद्योग : जिल्ह्यात १९९२ अखेर नोंदणीकृत लघुउद्योग घटकांची संख्या ३१४४ होती, तर नोंदणीकृत चालू असलेल्या लघुउद्योग घटकांची संख्या २८५० इतकी होती· जिल्ह्यात औद्योगिक वसाहतींची संख्या ५ इतकी आहे· औद्योगिक क्षेत्रफळ १३९·१३ हेक्टर आहे·

२) जिल्ह्यातील शैक्षणिक सुविधा : जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक सुविधा निर्माण झाल्या आहेत· सप्टेंबर १९९१ अखेर जिल्ह्यात एकूण प्राथमिक शाळा १३६२ होत्या· तर माध्यमिक शाळा ३४३ कला शिक्षण संस्था, २२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था मार्च १९९२

मध्ये ७ होत्या, त्यापैकी शासकीय शासन तहारित्यत ३, खाजगी ४ आहेत. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण संस्था (तांत्रिक २ स्तरावरील पदवी २ स्तरावरील किमान कौशल्य) शासकीय संस्था ३, अशासकीय अनुदानित संस्था ४४ इतर अशासकीय विनाअनुदानित २ संस्था मार्च १९९२ अखेर होत्या.

३) जिल्ह्यातील बँक कार्यालये : सांगली जिल्ह्यात सहकारी बँका व अर्बन बँका यांच्या शाखा मार्च १९९२ अखेर २९२ होत्या तर राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा १७४ होत्या.

४) जिल्ह्यातील नागरी भाग : सांगली जिल्ह्यामध्ये सांगली, मिरज, इस्लामपूर, तासगांव, विटा व आष्टा अशा ६ नगरपालिका असून यापैकी सांगली, मिरज या अ वर्गीय इस्लामपूर ब वर्गीय व इतर ३ क वर्गीय नगरपालिका आहेत.

१९९१ च्या जनगणनेनुसार नागरी भागाची ५,०२,०१२ इतकी लोकसंख्या होती, म्हणजे एकूण लोकसंख्येपैकी २३ टक्के लोक नागरी भागात राहतात.

३.९ : सांगली जिल्ह्याची खास वैशिष्ट्ये :

१) सांगली जिल्ह्यामध्ये एकूण ८ साखर कारखाने असून त्यापैकी सांगली येथील वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना हा आशिया खंडातील सर्वात मोठा साखर कारखाना आहे.

२) या जिल्ह्यामध्ये द्राक्ष पिकांचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात घेतले जाते. विशेषत: तासगांव तालुक्यातील चमन द्राक्षे (सिडलेस) यांमसन भारता बरोबरच मध्यपूर्ण देशामध्ये ही प्रसिध्द आहेत.

३) मिरज शहर सतार तयार करण्यामध्ये प्रसिध्द आहे. हा कौशल्य पूर्ण व्यवसाय येथे परंपरागत चालू आहे.

४) सांगली येथील घाऊक बाजारपेठ हळदीच्या वायदे बाजारासाठी प्रसिद्ध आहे.

५) सांगली येथील मिरज हे शहर मिशन हॉस्पिटल व इतर वैद्यकीय परिपूर्ण सेवेसाठी सुप्रसिद्ध आहे. पारंगत वैद्यकीय डॉक्टर यांच्या सेवा मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

६) सांगली जिल्ह्यात शिराळा तालुक्यात चांदोली येथे मातीचे मोठी धरण आहे. तसेच शिराळा येथे नागपंचमी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.

७) सुप्रसिद्ध दत्त स्थान औदुंबर व गोपूर गणेश मंदीर ही धार्मिक स्थळे तासगांव तालुक्यात आहेत.

८) सागरेश्वर (खानापूर) येथील अभयारण्य हे पर्यटनाचे केंद्र म्हणून विकसित झालेले आहे.

९) नाथ संप्रदायातील मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ व रेवणनाथ यांच्या समाध्या अनुक्रमे ~~अ~~ मच्छिंद्रगड (वाळवा) शिराळा व रेणावी (खानापूर) येथे असून भाविकांची तेथे वरीच गर्दी होटते.

३.१० : जिल्ह्यात ग्रामीण विकासाकरिता राबविलेले कार्यक्रम :

समाजातील तळागाळाच्या गरीब जनतेचे उत्पन्न वाढवून त्यांच्या उन्नतीकरीता केंद्र शासनाने गरीबी हटाव, दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या सालापासून राबविण्यास सुरवात केली आहे. या कार्यक्रमामध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम यांचा समावेश आहे; तसेच महाराष्ट्र शासनाचा रोजगार हमी कार्यक्रम देखील जिल्ह्यात राबविलेला आहे.

१) <u>एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम</u> :

रुपये ३५०० पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना उपजीविकेचे कायमचे साधन उपलब्ध करून देऊन त्यांचे वार्षिक उत्पन्न वाढवून त्यांचे जीवन समृद्ध करणेसाठी केंद्र शासनाने एकात्मिक ग्रामीण विकासाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम समाजातील दारिद्र्य रेषेखालील लहान / अतिलहान शेतकरी, शेतमजूर / इतर ग्रामीण कारागीर अनुसूचित जाती / जमातींच्या कुटुंबांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी १९८० साली दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची पाहणी करून यादी तयार करण्यात आली आहे. त्या पाहणीनुसार जिल्ह्यामध्ये एकूण ७८७८० कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील असल्याची आढळून आली. त्यापैकी २३७२९ कुटुंबे अनुसूचित जाती/ जमातींची असून त्यांचे प्रमाण एकूण कुटुंबांच्या ३० टक्के आहे. १९९०-९१ अखेर यापैकी ५५६९२ म्हणजेच ७१ टक्के कुटुंबांना लाभ देण्यात आला आहे. या लाभार्थी कुटुंबामध्ये अनुसूचित जाती/जमातींची १७५२८ कुटुंबे असून ती एकूण लाभार्थींच्या ३१ टक्के आहेत. या कार्यक्रमाखाली रुपये १८-१९ कोटी खर्च व ७.१४ कोटी अनुदान वाटप केलेले आहे. ५५६९२ लाभार्थीपैकी ३२२८८ लाभार्थी ६ व्या पंचवार्षिक योजनेतील, तर १७७९२ लाभार्थी हे ७ व्या योजनेच्या काळातील आहेत. ६ व्या व ७ व्या योजनेत अनुक्रमे रु.२.५२ कोटी व रु.५.१० कोटीचे वाटप केलेले आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत या कार्यक्रमाखाली रु.२०.३५ कोटी खर्च करण्यात आला आहे. तर वर्ष १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये अनुक्रमे रु.२.८५ व रु.२.६० कोटी खर्च झाला आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली २२.३९४ कुटुंबांना लाभ देण्यात आला असून यामध्ये अनुसूचित जातीच्या स्त्री लाभार्थींचाही समावेश आहे. याशिवाय १४;६०२ जुन्या लाभार्थींना आणि १७,७९२ नवीन कुटुंबांना अनुदान देण्यात आले आहे. या लाभार्थींना बँकेकडून कर्ज मिळवून देऊन ३३ टक्के

पर्यंत या योजनेखाली अनुदान देण्यात आले असून त्यांना स्वयं रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. वर्ष १९९०-९१ मध्ये ५,९६९ कुटुंबातील व ३५७ जुन्या कुटुंबातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे वर्ष १९९१-९२ मध्ये ४,७०९ नवीन कुटुंबांना लाभ दिला आहे. या कार्यक्रमाखाली जमीन सुधारणा, जलसिंचन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्य व्यवसाय , शेळ्या मेंढ्या पालन आदि शेतीशी निगडीत व्यवसायासाठी रेशीम उत्पादन, सुतारकाम, लोहार, चर्मकार, केश कर्तनालय, धुलाई केंद्र सुकड, इत्यादी ग्रामीण कारागीरांना, चर्मकार तसेच किराणा भुसार दुकान, हॉटेल, पिठाच्या गिरण्या, डंकमशिन, शिवणकाम, तयार कपडे, गाडी स्टेशनरी, फळे, भाजीपाला दुकान, बँड पथक, वर्कशॉप गॅरेज, इ. उद्योगांना अर्थसहाय्य, देण्यात आले आहे. या शिवाय ग्रामीण युवकांना स्वयंरोजगाराभिमुख व्यवसायात प्रशिक्षित करून त्यांना व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक सहाय्यही दिले आहे.

उत्पादक योजनेच्या धर्तीनुसार राष्ट्रीयकृत, व्यापारी व सहकारी बँकाद्वारे कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. सांगली जिल्ह्यात, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया, सांगली बँक, युनियन बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व महाराष्ट्र राज्य सहकारी व कृषी व ग्रामीण विकास बँक या बँका मार्फत हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सांगली जिल्ह्यात या योजनेखालील व जास्त लाभार्थी कवठेमहांकाळ व आटपाडी गटामधील आहेत.

२) <u>राष्ट्रीयकृत ग्रामीण रोजगार कार्यक्रम :</u>

'ग्रामीण भागातील बेरोजगार, अर्ध रोजगार, अनुसूचित जाती/जमातीचे लोक, दारिद्र्य रेषेखालील लोकांना जादा लाभदायक रोजगार उपलब्ध करून देऊन सामाजिक मालमत्ता निर्माण करून ग्रामीण लोकांचे

जीवनमान उंचावून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी ही योजना किंवा कार्यक्रम १९८२-८३ पासून १९८८-८९ पर्यंत राबविण्यात आला. १९८८-८९ पर्यंत केंद्र पुरस्कृत हा कार्यक्रम सांगली जिल्ह्यात राबविण्यात आला. सांगली जिल्ह्यामध्ये या कार्यक्रमाखाली रु.६.३२ कोटी खर्च करण्यात आले असून त्यामधून ४१.९३ लाख मनुष्यदिन रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. या कार्यक्रमाखाली सर्वाधिक खर्च व रोजगार उपलब्धता तासगाव गटात झाला असून त्या खालोखाल वाळवा,खानापूर व मिरज गटांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी खर्च व रोजगार निर्मिती आटपाडी गटात झालेली दिसून येते.

या कार्यक्रमाखाली जिल्ह्यामध्ये शाळा, इमारतींची बांधकामे, गटारे, अंगणवाड्या, बांधकामे, रस्ते इत्यादी स्वरूपाची २,६६२ कामे योजना सुरू झाल्यापासून केलेली आहेत.

३) <u>जवाहर रोजगार योजना</u> :

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम या दोन्ही योजनांचे एकत्रीकरण करून जवाहर रोजगार योजना दिनांक १-४-१९८९ पासून सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे ग्रामीण भागातील बेरोजगार, अर्ध रोजगार असलेल्या पुरुष - स्त्रियांना लाभदायक रोजगार उपलब्ध करून देणे तसेच या योजनेद्वारे उत्पादक व सामाजिक उपयुक्ततेची मालमत्ता निर्माण करून ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावणे हे आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून ८० टक्के व राज्य शासनाकडून २० टक्के निधी उपलब्ध करून दिला जातो. सांगली जिल्ह्यामध्ये वर्ष १९८९-९० व १९९०-९१ मध्ये रु.९.८६ कोटी खर्च झाला असून त्या खर्चातून ४२.५८ लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती करण्यात आलेली आहे. या योजनेखाली शाळा, रस्ते, गटारे, समाजमंदिरे, बालवाड्या, पंचायत

कार्यालये इ. प्रकारची बांधकामे केलेली आहेत. वर्ष १९९०-९१ मध्ये १८.६१ लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती करण्यात आली असून वर्ष १९९१-९२ मध्ये १४.६९ लाख मनुष्य दिवस रोजगार निर्मिती केली आहे. वर्ष १९८९-९०, १९९०-९१ मध्ये अनुक्रमे १,६०० व १,३१२ नवीन कामे घेण्यात आली होती. या शिवाय राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमांची २४२ कामे अपूर्ण होती. यातील मार्च १९९१ अखेर ३,०९१ कामे पूर्ण करण्यात आली असून १७२ कामे अपूर्ण आहेत.

४) रोजगार हमी योजना :-

या कार्यक्रमाखालील १८ वर्षे वयावरील प्रौढ व अंगमेहनतीचे आणि शारिरीक कष्टाचे काम करण्यास तयार असलेल्या कोणत्याही नागरिकास रोजगाराची हमी शासनाने दिली आहे. प्रतिदिनी ६ ७ तास काम केलेल्या मोबदल्यात कामाच्या प्रमाणात व कामाचा दर्जा विचारात घेऊन मजुरी दिली जाते. ही मजुरी किमान वेतनाइतकी कमीत कमी असते. या योजनेखाली टिकाऊ सामाजिक मालमत्ता निर्माण होईल. अशी उत्पादक श्रमप्रदान कामे उदा-मूलक, बंधारण, वनसंवर्धन, पाझर तलाव, नालमळी इत्यादी स्वरूपाची कामे घेतली जातात.

योजनेच्या सुरूवाती पासून वर्ष १९८९ अखेर या कार्यक्रमाखाली कृ ३ कालव्यांची मानण्याची कामे ४८७ पाझर तलाव, ११० गढ्यमळी, ४२ भूमिगत बंधारे, ३२६९ नाला बंडीगची कामे, १६८६४ हेक्टर मध्ये कंटूर व ग्रेडेड बंडीगची कामे व ५७०२ हेक्टरमध्ये वनीकरणाची कामे घेण्यात आली आहेत. जत, कवठेमहांकाळ, तासगांव, आटपाडी, खानापूर, व मिरज पूर्व भाग म्हणजेच अवर्षण प्रवण क्षेत्र तालुक्यातच रोजगाराची मागणी येत असल्याने कामे सुरू करण्यात आली होती.

या योजनेखाली जिल्ह्यात १९८९-९० अखेर ४९८१ कामे पूर्ण केली आहेत. सातव्या पंचवार्षिक योजनेत या कामावर रु.३०.५२ कोटी खर्च झाला असून १.४१ कोटी मनुष्यदिन रोजगार निर्मिती करण्यात

आलेली आहे. याशिवाय १९९०-९१ मध्ये रु. १.०५ कोटी खर्च करण्यात आला असून ४.१५ लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती झालेली आहे. या योजनेखालीच पाझर तलाव, लघु पाटबंधारे, गावतळी, भूमिगत बंधारे, रस्ते, नाला बंडींग, वनीकरण, जवाहर विहिर इ. प्रकारची कामे करण्यात आलेली आहेत. १९९१-९२ मध्ये या योजनेखाली २.९६ लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती करण्यात आली आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये रु.५.०७ कोटीची तरतूद या कार्यक्रमासाठी प्रस्तावित केलेली आहे.

५) <u>अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम</u> :

सांगली जिल्ह्यामध्ये आठ तालुक्यापैकी ६ तालुके दुष्काळग्रस्त आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी सांगली जिल्ह्यात १९७४ पासून अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम राबविला जात आहे. प्रथमत: केंद्र शासनाने जत व आटपाडी या दोन तालुक्याची निवड या कार्यक्रमा करिता केली होती. तथापि, या जिल्ह्यामध्ये मध्यम दुष्काळी परिस्थिती असलेल्या मिरज तहसीलामध्ये मालगांव, महसूल मंडळ, खानापूर तालुक्यातील खानापूर महसूल मंडळ, तासगांव मधील सावळज महसूल मंडळ व कवठेमहांकाळ तालुक्याकरिता ही योजना राज्य शासनाने प्रथमत: मंजूर केली आहे. नंतर १९८२ मध्ये केंद्र शासनाने या योजनेत मिरज, कवठेमहांकाळ व खानापूर तालुक्याचा समावेश केला आहे. तर १९८५-८६ सालापासून तासगांव तालुक्यातील सावळज महसूल मंडळाकरिता केंद्र शासनाने हा कार्यक्रम लागू केला आहे.

या योजनेमध्ये विकासाचा मूळ घटक लघु पाणलोट क्षेत्र मानला असून त्या क्षेत्राचा विकास करावयाचा आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेत जिल्हा पातळीवरील कार्यक्रमातून एकूण रु.२.५२ कोटीचा निधी खर्च करण्यात आला असून एवढाच निधी केंद्र शासनाने दिला

होता. यातून जमीन सुधारण्याची २६५ हेक्टरची कामे, ११२ नाला बंडीगची कामे, २१७५ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती, ६०२४ हेक्टरमध्ये अवनत वनांचे पुर्नवनीकरण व ५१.०४ लाख मत्स्य बीज साठवणे १६१ हेक्टरमध्ये वनीकरण इत्यादी स्वरूपाची कामे करण्यात आली आहेत.

आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये या कार्यक्रमा करिता रु.३.०७ कोटीची तरतूद सुचविण्यात आली असून त्यामधून १५० नाला बंडीगची कामे, १००० हेक्टर कंटूर बंडीगची कामे, ३००० हेक्टर खाजगी जमिनीवर वनीकरण, ६० लाख मत्स्यबीज साठवणूक, ११ दगडी बंधारे आणि १० पाणतळी घेण्याचे उद्दिष्ट आहे.

६) <u>जमीन सुधारणा :-</u>

महाराष्ट्र शेतजमीन अधिनियम १९६१ (जमीन धारणेवर कमाल मर्यादा) २६ जानेवारी १९६२ पासून अमलात आला या कायद्यानुसार अतिरिक्त म्हणून घोषित केलेली जमीन भूमीहीनांना व इतरांना वाटप करण्यात येते. सांगली जिल्ह्यामध्ये मार्च १९९० अखेर एकूण ५२९४ हेक्टर क्षेत्र अतिरिक्त म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यापैकी ४८०९ हेक्टर क्षेत्र २८८० भूमीहीनांना वाटप करण्यात आलेले आहे. मार्च १९९० अखेर २८८० लाभार्थी भूमीहीनांना रु.१८.६७ लाखाची शेत उपयोगी औजारांचे वाटप करण्यात आले आहे.

७) <u>सामूहिक विकास :-</u>

ग्रामीण सफाई कार्यक्रमाखाली ग्रामीण भागात संडास बांधणे करिता अनुदान देणे अभिप्रेत आहे. सातव्या योजनेच्या काळात १,१२९ कुटुंबांना संडास बांधण्याकरिता अर्थ सहाय्य देण्यात आलेले आहे. वर्ष १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये अनुक्रमे १०० व २३ संडास बांधण्याकरिता अर्थ सहाय्य देण्यात आलेले आहे.

८) पंतप्रधान रोजगार योजना :

सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत असल्याने त्यांच्यावर अधिक लक्ष केंद्रित होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षित बेकार युवकांना रोजगार निर्माण करुन देण्याचे उद्देशाने २ ऑक्टोबर १९९३ रोजी पंतप्रधान रोजगार योजनेचा प्रारंभ झाला. चोवीस हजार रु.वार्षिक उत्पन्न असलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवकांना या योजनेखाली स्वयंरोजगारासाठी बँकेकडून कर्जपुरवठा केला जातो.

शालांत परीक्षा उत्तीर्ण अनुत्तीर्ण आय.टी.आय.व इतर तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांना या योजनेचा लाभ मिळतो. लाभार्थींना १ लाख रुपये पर्यंत कर्ज दिले जाते. केंद्र सरकार १५ टक्के सवलत देणे व लाभार्थींना ५ टक्के रक्कम स्वत: उभीर करावी लागते. पंतप्रधान रोजगार योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यात ६५० प्रकरणांना १९९४-९५ साली मंजुरी देण्याचे व अर्थसहाय्य देण्याचे उद्दिष्ट असून माहे ऑगस्ट १९९४ ७९० प्रकरणे मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहेत व त्यापैकी ५६ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.

९) वीस कलमी कार्यक्रम :

ग्रामीण भागातील गरिब व दुर्बल जनतेचे जीवनमान सुधारणे व त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी पायाभूत सोयी निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सांगली जिल्ह्यामध्ये दारिद्र्य निर्मूलनासाठी २० कलमा पैकी ११ कलमे राबविली जात आहेत. वीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सांगली जिल्हा वर्ष १९८७-८८, १९८८-८९ मध्ये प्रथम क्रमांकावर होता. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात २० कलमी कार्यक्रमावर जिल्हा योजनेतून रु.२८.६० कोटी खर्च करण्यात आला आहे. वर्ष १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये अनुक्रमे रु.६.५९ आणि रु.८.५९ कोटीचा खर्च झालेला आहे.

२० कलमी कार्यक्रमार्तंर्गत लघुउद्योग घटकांची स्थापना करण्या साठी ५८० चे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यापैकी ३१७ उद्योग आहे. माहे ऑगस्ट पर्यंत स्थापना करण्यात आले आहेत.

२.११ : जिल्ह्यात नागरी विकासाकरिता राबविलेले कार्यक्रम :

सांगली जिल्ह्यामध्ये सांगली, मिरज, इस्लामपूर, तासगांव, विटा व आष्टा अशा ६ नगरपालिका असून त्यापैकी सांगली व मिरज "अ" वर्गीय, इस्लामपूर "ब" वर्गीय व इतर तीन "क" वर्गीय नगरपालिका आहेत. सांगली जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्यपैकी २२ टक्के लोकसंख्या नागरी विभागात राहते. या नागरी लोकसंख्येस पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, रस्ते, बाग-बगीचे आदी सोयी पुरविण्याची प्राथमिक जबाबदारी नगरपालिकांची आहे. पण नगरपालिकेचे उत्पन्न मर्यादित असल्याने नगरपालिकांना वरील सुविधा पुरविणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना शासकीय अर्थ सहाय्याची मदत या सुविधा म पुरविण्याकरिता निधी देणे गरजेचे अ र पडते.

नगर विकास कार्यक्रमाखाली ३ योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

१) नगरपरिषदांना आर्थिक सहाय्य :

"अ" वर्गीय नगरपालिकांना विकास योजनेतील कामासाठी मंजूर अंदाजपत्रकाची रकमेच्या १/३ अनुदान व २/३ कर्ज मिळू शकते. तर "ब" व "क" वर्गीय नगरपरिषदांना मंजूर अंदाजपत्रकीच्या रकमेच्या १/२ कर्ज व १/२ अनुदान मिळू शकते. तसेच १५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ड वर्गीय ~~ब्बब्बरिक्ष~~ नगरपालिकेसाठी १०० टक्के अनुदान अनुत्पादित कामांना मिळू शकते.

सांगली जिल्ह्यातील नगरपालिकेचा १९९०-९१ मध्ये १२.१३ लाख

रुपये आर्थिक सहाय्य दिले तर १९९१-९२ मध्ये ११·३० लाख रुपये आर्थिक सहाय्य वरील योजनेतून दिले गेले·

या आर्थिक सहाय्यातून जिल्ह्यातील नगरपालिकांनी रेस्ता, भूसंपादन, दवाखाने भूसंपादन, हिंदी लायब्ररी भूसंपादन, रस्ता रुंदीकरण लायब्ररी, बांधकाम, खेळाचे मैदान भोवती कुंपण भिंत बांधणे, प्राथमिक शाळा बांधकाम करणे इत्यादी कामे केली गेली आहेत·

२) एकात्मिकृत नगर विकास कार्यक्रम :

या योजनेखाली इस्लामपूर शहराची निवड करण्यात आली असून या शहराच्या विकासाकरिता हा कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे· ही योजना केंद्र पुरस्कृत आहे· एकूण रु· ८० लाख खर्चाची योजना मंजूर झाली असून ५० लाख केंद्राकडून कर्ज स्वरुपात व रु·२० लाख राज्य शासनाकडून अनुदान स्वरुपात मंजूर झाली असून उर्वरित रक्कम नगरपालिकेने त्यांच्या उत्पन्नातून खर्च करावयाची आहे· ही योजना १९८२ पासून लागू करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात ही योजना सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीतच राबविण्यात आली· या योजनेखाली या कालावधीत रु·७८·७८ लाख खर्च झाला असून त्यापैकी रु·१०·३७ लाख खर्च राज्य शासनाचा आहे· या योजनेखाली विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत·

३) गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम :

गलिच्छ वस्तीसुधारणा कार्यक्रम जिल्ह्यातील सांगली व मिरज नगरपालिकेला लागू असला तरी सध्या हा कार्यक्रम फक्त सांगली नगरपालिका राबवीत आहे· पाणी पुरवठा, रस्ते, दिवाबत्ती, सार्वजनिक संडास, गटारे इ· मूलभूत सुविधा गलिच्छ वस्त्यांना पुरविणे हे या योजनेखाली अभिप्रेत आहे· वरील मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध

करून देण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. हे अनुदान दरडोई रु.२५० या प्रमाणात असते. सांगलीमध्ये इंदिरा झोपडपट्टीमध्ये मुलभूत सोयी पुरवण्यात आलेल्या असून त्यावर सालच्या योजनेत रु.६४,००० खर्च झालेला असून २५६ लोकांना लाभ दिला आहे.

४) नागरी भागातील दारिद्र्य निर्मूलनासाठी राबविलेल्या योजना :

१) नेहरु रोजगार योजना :

नागरी भागातील गरिबांना स्वयं रोजगार किंवा वेतना रोजगार पुरविणे या उद्देशाने ऑक्टोबर १९८९ मध्ये नेहरु रोजगार योजना सुरु करण्यात आली व मार्च १९९० मध्ये तिची पुर्नरचना करण्यात आली. १९८४-८५ च्या किंमतीनुसार ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ७२००/- रुपये कमी आहे. अशा कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळतो. १९९०-९१ मध्ये ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ९,६५० रुपये आहे. अशा कुटुंबाना या योजनेचा लाभ मिळतो.

सांगली नगरपालिका त्याचबरोबर मिरज,तासगांव,विटा, इस्लामपूर व आष्टा या नगरपालिका कार्यक्षेत्रात ही योजना राबविली जात आहे. या योजनेतून लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी अर्थ सहाय्य दिले जात आहे. नेहरु रोजगार योजनेमधून पुरुष लाभार्थींना १२०००/- हजार रुपये तर स्त्री लाभार्थींना १५ हजार रुपये कर्जपुरवठा राष्ट्रीयकृत बँकामार्फत केला जातो. लाभार्थींना बँकांनी जो कर्जपुरवठा केला आहे त्या कर्ज रकमेच्या २५ टक्के रक्कम सरकारकडून अनुदान म्हणून दिली जाते. सांगली,मिरज,तासगांव,विटा,इस्लामपूर व आष्टा या संबंधीत शहरात जे किरकोळ स्वरुपाचे व्यवसाय आहेत अशा व्यवसायासाठी लाभार्थींना कर्जपुरवठा केलेला आहे.

३) नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयंरोजगार योजना :-

शहरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वत: रोजगार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून ती सप्टेंबर १९८६ सालापासून सुरु झालेली आहे. ही योजना सांगली, शहर, विटा, मिरज, इस्लामपूर, तासगांव आष्टा या नागरी भागात राष्ट्रीयीकृत बँकामार्फत १९८६ सालापासून राबविली गेली आहे. संबंधीत शहरात राष्ट्रीयीकृत बँकांच्या ज्या शाखा आहेत त्या शाखा मार्फत शहरी भागातील ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८००० पर्यंत आहेत अशा कुटुंबातील एका व्यक्तीला ५००० रुपये स्वयं रोजगारासाठी कर्ज दिले गेलेले आहे. संबंधीत शहरात जे किरकोळ स्वरुपाचे व्यवसाय आहेत अशा व्यवसायासाठी लाभार्थींना अर्थ सहाय्य दिले गेलेले आहे. प्रत्येक वर्षी राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांना या योजनेखाली किती लोकांना कर्जपुरवठा करावा याबाबत विशिष्ट उद्दिष्ट ठरवून दिले गेलेले आहे. ते उद्दिष्ट पूर्ण करण्याचे काम प्रत्येक शाखेकडून केले गेले आहे.

संदर्भ :-


१) सांगली जिल्हा संबंधी पंचवार्षिक योजनेचा आराखडा.

२) जिल्हा नियोजन व विकास मंडळ, सांगली

३) जिल्हा उद्योग केंद्र.